ठळक बातम्या

- हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावरचा दुष्परिणाम कमी करण्यासाठी सखोल संशोधनाची गरज असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- व्हिसा प्रणालीचं सुलभीकरण करण्याचा सरकारचा निर्णय, मुख्य व्हिसा श्रेणींची संख्या १३ वरून ९ वर

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज भारत कृषी परिषद २०२६ ला संबोधित करणार

- हिंगोलीत हळदीला ३३ हजार रुपये प्रति क्विंटल इतका विक्रमी भाव

आणि

- १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत अफगाणिस्तानला हरवून भारत अंतिम फेरीत दाखल /विजेतेपदासाठी शनिवारी पाकिस्तानशी लढत

<><><><><><>

हवामान बदलाचा सर्वाधिक दुष्परिणाम कृषी क्षेत्रावर होतो. हा दुष्परिणाम कमी करण्यासाठी या क्षेत्रात सखोल संशोधन होणं ही काळाची गरज आहे. नंदकिशोर जयस्वाल कृषी महाविद्यालयाच्या माध्यमातून अशा प्रकारचं संशोधन केलं जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

नागपूरात रामटेक इथं दत्ता मेघे फाउंडेशन आणि मेघे ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्सनं उभारलेल्या नंदकिशोर जयस्वाल कृषी महाविद्यालय आणि शालिनीताई दत्ता मेघे पशु वैद्यकीय रुग्णालयाच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत उपस्थिती होते.

विदर्भात दुग्ध व्यवसाय वाढावा यासाठी प्रयत्न केले जावेत. यासाठी शालिनीताई मेघे पशु वैद्यकीय महाविद्यालयानं पुढाकार घ्यावा, असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचं शिक्षण, शेतीचा विकास आणि पशु धनासाठी

दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं या दोन्ही संस्था मोलाची भूमिका बजावतील असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

<><><><><><>

सरकारनं व्हिसा प्रणालीचं सुलभीकरण केलं असून, मुख्य व्हिसा श्रेणींची संख्या १३ वरून ९ वर आणि उप-श्रेणींची संख्या ४९ वरून २३ वर आणली आहे. पर्यटन, वैद्यकीय उपचार तसंच शिक्षण या निमित्ताने भारतात येणाऱ्या परदेशी नागरिकांचा ओघ वाढावा हा या निर्णयामागचा उद्देश असल्याचं केंद्रीय गृहखात्यांनं स्पष्ट केलं आहे. याआधी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्येही मुख्य व्हिसा श्रेणींची संख्या २२ वरून १३ वर आणि उप-श्रेणींची संख्या ६३ वरून ४९ वर आणण्यात आली होती. सर्व २३ व्हिसा श्रेणी आणि उप-श्रेणींसाठी आवश्यक असणाऱ्या रकान्यांची संख्या ६५ ते ७० टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. भारतीय व्हिसा प्रणालीमध्ये केलेले हे सर्व बदल लागू करण्यासाठी मंत्रालय आपल्या माहिती तंत्रज्ञान प्रणालीमध्ये सुधारणा करत असून, वर्षाच्या अखेरीला नवीन सुलभ रचनेनुसार व्हिसा दिले जातील.

<><><><><><>

देश स्वातंत्र्याची शंभर वर्ष पूर्ण करण्यापूर्वी विकसित भारत प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत असं सांगत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साधण्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिल्ली इथं दिवाळी मिलन या कार्यक्रमाला संबोधित करताना केला. भाजपा मुख्यालयात हा कार्यक्रम आयोजित केला होता. गेल्या काही वर्षात भारताच्या कामगिरीबद्दल सांगताना चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर चांद्रयान उतरवून भारतानं इतिहास रचल्याचा उल्लेख त्यांनी केला. भारत हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा मोबाईल फोन उत्पादक देश असल्याचंही त्यांनी यावेळी नमूद केलं. भारताच्या विविध क्षेत्रातल्या यशाला माध्यमांनी प्रसिद्धी द्यावी असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

- - - होल्ड - बाईट - प्रधानमंत्री - - -

- <><><><><>

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात 'भगवान बिरसा मुंडा गौरव दिन सप्ताह' आयोजित करण्यात आला असून या सप्ताहात सरकार अनुसूचित जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना देणारे विविध उपक्रम

राबवत आहे, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली.

या सप्ताहात उद्या न्यूक्लियस बजेट योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांना धनादेश वितरण, महिला बचत गटांना लाभ दिले जाणार आहेत तर येत्या शनिवारी राज्यभरातल्या स्मारकांची स्वच्छता आणि दीपोत्सव करण्यात येणार आहे. आदिवासी आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक सक्षमीकरण दिन साजरा करून सप्तहाचा समारोप होईल, असं शेलार यांनी सांगितलं.

यवतमाळ जिल्ह्यातही जनजातीय गौरव सेवा सप्ताह साजरा करण्यात येत असून या सप्ताहात आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शासकीय योजना, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, अशी माहिती पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली.

<><><><><><>

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची आज एकमतानं निवड झाली. रणजितसिंह देशमुख यांची निवड उपाध्यक्षपदी करण्यात आली. जिल्हा उपनिबंधकांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया आज पार पडली.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भरणाऱ्या भारत कृषी परिषद २०२६ ला संबोधित करतील. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत धोरणकर्ते, मुत्सद्दी, उद्योग क्षेत्रातले दिग्गज आणि कृषी शास्त्रज्ञ यांच्यासोबतच देशभरातले २००० शेतकरी सहभागी होणार आहेत. पद्मश्रीप्राप्त २० प्रगतीशील शेतकरी या परिषदेत नावीन्यपूर्ण उपक्रमांचे अनुभव आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा आपला प्रवास मांडणार आहेत.

<><><><><><>

हिंगोली जिल्ह्यातल्या वसमत कृषी उत्पन्न बाजार समितीत आज झालेल्या लिलावात उच्च प्रतीच्या हळदीला सुमारे ३३ हजार रुपये प्रति क्विंटल इतका विक्रमी भाव मिळाला.

इतर प्रतीच्या हळदीलाही ३० ते २२ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत भाव मिळाला. या अनपेक्षित तेजीमुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचं वातावरण पसरलं आहे.

<><><><><><>

१९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज अफगाणिस्तानला ८ गडी राखून पराभूत करत भारतानं अंतिम सामन्यात स्थान मिळवलं. ओमान इथं झालेल्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्ताननं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ८ बाद २२७ धावा केल्या. भारतानं अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात सदतिसाव्या षटकात विजया लक्ष्य पार करत २३० धावा केल्या.

या स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्ताननं बांगलादेशावर ९ गडी राखून विजय मिळवला. स्पर्धेचा अंतिम सामना येत्या १४ नोव्हेंबरला भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणार असून संध्याकाळी पाच वाजता सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><><>

भारताचे पहिले प्रधानमंत्री आणि आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने 'भारतभाग्यविधाता' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. मुंबईत टिळक भवन इथं होणाऱ्या या कार्यक्रमाला राजकीय नेत्यांबरोबरच इतर क्षेत्रातले मान्यवर उपस्थित असतील. नागरिकांनीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावं, असं आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलं आहे.

<><><><><><>

देश 'विकसित भारत-२०४७' हे लक्ष्य साकार करण्याच्या दिशेने मार्गक्रमणा करत आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. राष्ट्रपती भवन इथं एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांशी राष्ट्रपतींनी आज संवाद साधला. एकलव्य मॉडेल निवासी शाळेतून आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण तर मिळतेच त्याशिवाय त्यांच्या बहुआयामी प्रतिभेला वाव देण्यासाठी संधीही उपलब्ध होते, असं त्या म्हणाल्या.

<><><><><><>

नवी दिल्ली इथं केंद्रीय विद्यालय संघटनेच्या तीन प्रमुख डिजिटल उपक्रमांचं उद्घाटन केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते आज झालं. यामध्ये समीक्षा हा एआय बॉट असलेलं

विद्या समीक्षा केंद्र, पालकांसाठी केव्हीएस-संवाद ॲप आणि वेब पोर्टल, तसेच केव्हीएस माजी विद्यार्थी संपर्क पोर्टल यांचा समावेश आहे. हे उपक्रम केवळ केंद्रीय विद्यालयांपुरते मर्यादित न ठेवता संपूर्ण शालेय शिक्षण व्यवस्थेतल्या विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी विस्तारित केले जावेत, असं आवाहन जोशी यांनी यावेळी केलं.

<><><><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमान सरासरीपेक्षा कमी होते तर तुरळक ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय घट झाली. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमान सरासरीपेक्षा कमी होते. मराठवाड्यात किमान तापमान सरासरीच्या जवळपास होते.

येत्या दोन दिवसात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><><>//